## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३१/२०२३ मधील नि.५ वरील आदेश

(रेखा पाटील व अन्य वि. संदीप पाटील वगैरे)

अर्जदार यांनी जाबदार यांचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मंजूर होवून मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.

२. अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचा विवाह दिनांक २३.११.२०१६ रोजी मौजे जत, जि. सांगली यथे संपन्न झाला. सदर विवाह संबंधातून उभयतांना शौर्य व शिवांश अशी दोन अपत्ये आहेत. शिवांश अर्जदार क्र.१ यांचेसोबत रहात असून शौर्य जाबदार क्र.१ यांचेसोबत राहणेस आहे. अर्जदार यांच्या विवाहाचा सर्व खर्च त्यांचे आई व बहिणीने केला. विवाहानंतर अर्जदार क्र.१ ही जाबदार यांचेकडे तासगांव येथील भाडयाच्या घरात नांदणेस गेली. तेथे धर्मकार्य व धार्मिक विधी पार पाडण्यात आले. त्यावेळी जाबदार क्र.३ हे अर्जदार क्र.१ यांचेशी काहीच बोलत नव्हते. जाबदार क्र.३ यांच्या बोलण्यावरुन त्यांना अर्जदार पसंद नसल्याचे अर्जदार यांच्या लक्षात आले. त्यानंतर अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ व २ हे कोंडवा, पुणे येथे भाडेतत्वावर राहणेस गेले. दिनांक ०१.०८.२०१८ रोजी उभयतांना शौर्य मुलगा जन्मास आला. जाबदार क्र.१ यांचे कुणाबरोबरच पटत नव्हते. गावाकडून फोन आला की, जाबदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ यांचेशी द्वेशाने व रागाने वागत असे. अर्जदार क्र.१ ही लोखंडी कॉटवर झोपलेली असताना तिला जाबदार क्र.१ ने कॉटवरुन खाली ढकलून दिले व तिच्या नरडयावर पाय देवून हाताने मारहाण केली. अर्जदार क्र.१ हिने विनंती करुन देखील तिचे कान सुजेपर्यंत जाबदार क्र.१ ने मारहाण व शिवीगाळ केली.

**३.** अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले की, दिनांक ३१.०५.२०२२ रोजी जाबदार क्र.३ हे एस.टी. सेवेतून निवृत्त झाले असून त्यांना १५ ते २० लाख रुपये मिळाले आहेत. चारचाकी घेण्यावरुन व नवीन घर कोणत्या ठिकाणी बांधावयाचे यावरुन जाबदार क्र.१ ते ३ व जाबदार क्र.१ यांचा भाउ विजय यांच्यामध्ये खूप मोठे भांडण झाले. त्यावेळी मध्यरात्रीच जाबदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर हाकलून दिले. अर्जदार क्र.१ हिने विनवणी केली असता, तिच्याकडील कानवेल, छल्ला व बारश्यातील सर्व दागिणे हिसकावून घेवून जाबदार क्र.१ स्वतःच घरातून निघून गेले. त्यानंतर दिनांक ०६.०८.२०२२ रोजी कोणतेही कारण नसताना अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर काढले व जबरदस्तीने नेवून जतला जाणाऱ्या बसमध्ये बसवले आणि अर्जदारची बहिण माधुरी हिस फोन करुन अर्जदारचे दुसरे लग्न करुन दया, मी पण दुसरे लग्न करणार आहे असे सांगितले.

**४.** अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यास घेवून अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत त्यांच्या आईच्या घरी रहात आहे. परंतु, जाबदार क्र.१ हे मदय प्राशन करुन अर्जदार यांच्या आईच्या जत येथील घरी येवून दंगा करणे व घरातील सर्वांना जीवे मारण्याची धमकी देणे अशी कृत्ये करत आहेत. तसेच दिनांक २५.०१.२०२३ रोजी जाबदार क्र.१ व २ हे अर्जदार यांचे घरी येवून, 'घटस्फोट कधी देणार, जरी नाही दिला तर, तुझं दुसरं पोरगं देणार नाही, कोण किती दिवस सांभाळतयं बघू' असे म्हणाले. तसेच जाबदार क्र.१ हे माधुरी पाटील–चव्हाण व मध्यस्थी संतोष मधुकर देवकर यांचे भ्रमणध्वनीवर वारंवार घटस्फोटाचे संदेश पाठवून अपमानास्पद वागणूक देत आहेत. अशाप्रकारे, जाबदार यांनी अर्जदारास निष्कारण त्रास दिलेला आहे.

**५.** अर्जदार क्र.१ यांच्या कथनानुसार, जाबदार क्र.१ यांची आर्थिक स्थिती उत्तम असताना त्यांनी अर्जदार यांच्या माहेरी पैशाची व सोन्याची मागणी केली. अर्जदार

क्र.१ यांना त्रास होवू नये म्हणून त्यांची बहिण मनिषा हिने सुरुवातीस दिनांक २६.०७.२०२१ रोजी रुपये १०,०००/- व नंतर दिनांक १३.०५.२०२२ रोजी पुन्हा रुपये १०,०००/- जाबदार क्र.१ यांना दिले. जाबदार यांचे मौजे ढवळी ता. तासगांव येथे दगडी बांधकाम केलेले दोन खोल्यांचे नवीन घर व वडीलोपार्जित अर्धा एकर शेती आहे. जाबदार क्र.२ च्या नावे ढवळी येथे गट क्र.७४१ मध्ये सामाईकात ०.११०४ हे.आर. व जाबदार क्र.३ च्या नावे गट क्र.१४२ मध्ये ०.००.६७ हे.आर. व गट क्र.३११ मध्ये ०.०६.७५ हे.आर. भूखंड आहेत. विटा रोडवर जाबदार क्र.२ च्या नावे गट क्र.१११/१/२/३ मध्ये ०.०२.०० गुंठयाचे, गट क्र.२३९/१/२/अ मध्ये ०.०५.०० गुंठयाचे बिगरशेती भूखंड असून जाबदार क्र.३ च्या नावे गट क्र.४६१/२/१/ब मध्ये ०.०२.०० गुंठे भूखंड आहे. सध्या जाबदार क्र.३ यांना प्रतिमाह पेन्शन मिळते तसेच जाबदार क्र.१ हा ट्रॅक्टर शोरुममध्ये कामास असून पगार, भत्ते व कमिशन पोटी त्याला दरमहा रुपये ३०,०००/- मिळतात. जाबदार क्र.१ यांचा भाउ विजय हा जिल्हा न्यायालय, सांगली येथे कायमस्वरुपी नोकरीस असून त्याला प्रतिमाह रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त वेतन मिळते. जाबदार यांचेवर कोणतीही जबाबदारी नाही. याउलट, अर्जदारास कोणताही कामधंदा, व्यवसाय नसल्यामुळे तिच्या व अर्जदार क्र.२ यांच्या पोटापाण्याची, औषधोपचाराची व्यवस्था होणे अत्यंत कठीण आहे. त्यातच जाबदार क्र.१ हे दुसरा मुलगा शौर्य यासही अर्जदाराकडेच सोडून दुसरे लग्न करण्याची भिती दाखवत आहे. अर्जदार यांची आई वयस्कर असून ती अर्जदारांची जबाबदारी पेलू शकत नाही. प्रस्तूत अर्जाचा निकाल लागणेस बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार क्र.१ यांचेकरिता दरमहा रुपये ६,०००/- व अर्जदार क्र.२ करिता दरमहा रुपये ४,०००/- अंतरिम पोटगी मिळणेबाबतची विनंती केली आहे.

६. प्रस्तुत अर्जाची नोटीस जाबदार क्र.१ ते ३ यांना मिळाल्यानंतर ते प्रस्तूत कामी हजर झाले. नि.क्र.२१ कडे जाबदारांनी त्यांचे म्हणणे सादर केले. अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचा विवाह झाल्याचे व उभयतांना शिवांश व शौर्य अशी दोन अपत्ये असल्याची बाब त्यांनी मान्य केलेली आहे. त्याव्यतिरिक्त इतर सर्व कथने अमान्य केली आहेत. जाबदार यांच्या कथनानुसार, जाबदार क्र.१ हा व्यसनी असल्यामुळे त्यांचा विवाह अर्जदार क्र.१ चे घरच्यांनी मोडला होता. त्याकरिता अब्रु नुकसानीची व फसवणुकीची केस घालणार अशी भिती दाखवून जाबदार यांचेकडून दंड म्हणून रक्कम रुपये ८०,०००/- अर्जदारांनी घेतले. त्यानंतर अर्जदार क्र.१ व त्यांचे नातेवाईकांना त्यांची चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी स्वखर्चाने दिनांक २३.११.२०१६ रोजी उभयतांचा विवाह करुन दिला. धार्मिक विधी संपल्यानंतर उभयता पुणे येथे रहावयास गेले. परंतु, अर्जदार क्र.१ यांची आई जत येथे एकटीच राहते, ती सारखी आजारी पडते म्हणून अर्जदार क्र.१ ही त्यांच्या आईकडे जावू लागली व जाबदार क्र.१ यांचेकडे जत येथे राहणेबाबत तगादा लावला. परंतु जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ यांची समजूत काढत होते. अर्जदार क्र.१ ही तिचे बहिणीचे ऐकून जाबदार क्र.१ यांचेशी वाद घालत असे. अर्जदार क्र.१ हिचे कंपनीतील उध्दट बोलण्यामुळे अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांना कंपनीतून काढून टाकले. तासगांव व ढवळी येथे राहणेबाबत उभयतांमध्ये भांडणे होवू लागली. दिनांक ०१.०८.२०१८ रोजी उभयतांना शौर्य नावाचा मुलगा जन्मला. त्याचा सर्व खर्च जाबदार क्र.१ यांनीच केला. जत येथे राहणेबाबत अर्जदार क्र.१ दररोज वाद घालत असे. दिनांक ०६.०८.२०२२ रोजी माधुरीचे शिकवणुकीवरुन अर्जदार क्र.१ ही काही एक न सांगता शिवांशला घेवून शौर्यला जाबदार क्र.१ यांचेकडे सोडून जतला निघून गेली. जाबदार क्र.१ यांनी फोनवरुन संपर्क साधणेचा प्रयत्न केला, परंतु, अर्जदार क्र.१ यांनी तो उचलला नाही. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांनी त्यांचे मित्र सचिन निकम व अमोल यांना घेवून अर्जदार क्र.१ यांच्या घरी गेले. त्यावेळी माधुरीने त्यांना घरी येवून दिले नाही. जाबदार क्र.२ व ३

हे स्वतः बोलविणेस आले असता, अर्जदार क्र.१ यांच्या आईने तिला पाठवणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर मध्यस्थी संतोष देवकर यांच्यामार्फत नांदविणेस नेण्याचा बराच प्रयत्न केला असता त्याला अर्जदार यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही. माधुरी हिचे शिकवणुकीवरुन अर्जदार क्र.१ ही जाबदार क्र.१ यांचेकडे नांदणेस आली नाही. जाबदार क्र.१ यांनी दिनांक ०२.११.२०२२ रोजी तासगांव येथील समुपदेशन कार्यालयात अर्जदार क्र.१ यांनी नांदणेस यावे याकरिता मध्यस्थीसाठी अर्ज दाखल केला होता. परंतु, अर्जदारने त्याला देखील प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर जाबदार क्र.२ यांनी सरपंच श्री. विकास तुकाराम डावरे, श्री. शहाजी बोधले व चंद्रकांत पाटील यांना घेवून अर्जदार क्र.१ यांच्या घरी गेले. परंतु, अर्जदारच्या आईने तिला पाठविणेस नकार दिला.

**७.** जाबदार यांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार क्र.१ यांच्या बहिणीने जाबदार क्र.१ यांच्याकडून रुपये ५०,०००/– पुण्यात असताना उसने घेतले होते. परंतु, त्याची परतफेड केलेली नाही. सुरुवातीला रुपये १०,०००/– नंतर एक वर्षाने रुपये १०,०००/– असे पैसे दिले. परंतु, उर्वरित पैसे दिले नाहीत. त्यामुळे, अर्जदाराला नांदविणेस पाठविले नाही. त्यामुळे, जाबदार क्र.२ यांच्या भावना दुखावल्या गेल्या व त्यामुळे त्यांच्या छातीत वेदना होवू लागल्या. जाबदार क्र.२ यांना भारती हॉस्पीटल, सांगली येथे दाखल केले असता तेथे त्यांचेवर बायपास सर्जरी करण्यात आली. सध्या जाबदार क्र.२ ही शरीराने कमकुवत असून तिला महिन्यातून एकदा उपचारासाठी दवाखान्यात न्यावे लागते. जाबदार क्र.३ यांना देखील अतिविचार करुन मानसिक तणावामुळे मेंदुला रक्त पुरवठा कमी होत आहे. त्यामुळे, त्यांचेवर देखील उपचार चालू आहेत. त्याचबरोबर, जाबदार क्र.१ हे सध्या मानसिक तणावाखाली असून ते सध्या त्यांच्या वयस्कर आज्ञी सोबत शौर्यला घेवून ढवळी येथे राहतात. मिळेल त्या ठिकाणी बदली चालक म्हणून काम करतात. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. याउलट,

अर्जदार क्र.१ हिचे बी.सी.ए. पर्यंत शिक्षण झाले असून ती कॉम्प्युटर सेंटरमध्ये नोकरी करते व तिला दरमहा रुपये १५,०००/- पगार मिळतो. तसेच ऑनलाईन काम करुन दरमहा रुपये १०,०००/- वेतन मिळते. अर्जदार क्र.१ चे आईस रुपये २०,०००/- पेन्शन मिळते. अर्जदार यांना पोटगी देण्याची त्यांची ऐपत नसल्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

८. अर्जदार हिच्या कथनावरुन पुढील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यांची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांचेवर जाबदारकडून कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे ही बाब त्यांनी प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार क्र.१ हे दरमहा रुपये ६,०००/- व अर्जदार क्र.२ हे दरमहा रुपये ४,०००/- जाबदार क्र.१ यांचेकडून अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत काय? | अंशतः होकारार्थी. अर्जदार क्र.१ हे दरमहा रुपये ४,०००/- व अर्जदार क्र.२ हे दरमहा रुपये २,०००/- अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. |
| ३. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**विचाराधीन बाब क्र.१ बाबतः–**

९. प्रस्तुतचा अंतरिम पोटगी मिळण्याच्या अर्जाचा विचार करताना अर्जदारवर जाबदार यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे ही बाब अर्जदार यांनी प्रथमदर्शनी सिध्द केली पाहिजे. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, जाबदार क्र.१ यांचे कुणाबरोबरच पटत नव्हते. गावाकडून फोन आला की, जाबदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ यांचेशी द्वेशाने व रागाने वागत असे. अर्जदार क्र.१ ही लोखंडी कॉटवर झोपलेली असताना तिला जाबदार क्र.१ ने कॉटवरुन खाली ढकलून दिले व तिच्या नरडयावर पाय देवून हाताने मारहाण केली. अर्जदार क्र.१ हिने विनंती करुन देखील तिचे कान सुजेपर्यंत जाबदार क्र.१ ने मारहाण व शिवीगाळ केली. तसेच चारचाकी घेण्यावरुन व नवीन घर कोणत्या ठिकाणी बांधावयाचे यावरुन जाबदार क्र.१ ते ३ व जाबदार क्र.१ यांचा भाउ विजय यांच्यामध्ये खूप मोठे भांडण झाले. त्यावेळी मध्यरात्रीच जाबदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर हाकलून दिले. अर्जदार क्र.१ हिने विनवणी केली असता, तिच्याकडील कानवेल, छल्ला व बारश्यातील सर्व दागिणे हिसकावून घेवून जाबदार क्र.१ स्वतःच घरातून निघून गेले. त्यानंतर दिनांक ०६.०८.२०२२ रोजी कोणतेही कारण नसताना अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर काढले व जबरदस्तीने नेवून जतला जाणाऱ्या बसमध्ये बसवले आणि अर्जदारची बहिण माधुरी हिस फोन करुन अर्जदारचे दुसरे लग्न करुन दया, मी पण दुसरे लग्न करणार आहे असे सांगितले. जाबदार क्र.१ हे मदय प्राशन करुन अर्जदार यांच्या आईच्या जत येथील घरी येवून दंगा करणे व घरातील सर्वांना जीवे मारण्याची धमकी देणे अशी कृत्ये करत आहेत. तसेच दिनांक २५.०१.२०२३ रोजी जाबदार क्र.१ व २ हे अर्जदार यांचे घरी येवून, 'घटस्फोट कधी देणार, जरी नाही दिला तर, तुझं दुसरं पोरगं देणार नाही, कोण किती दिवस सांभाळतयं बघू' असे म्हणाले. अर्जदार हिची कथने व त्याचे पृष्ठयर्थ

सादर केलेला प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा पाहता अर्जदार यांचेवर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याची बाब प्रथमदर्शनी अर्जदार क्र.१ हिने सिध्द केलेली आहे. सबब, विचाराधीन बाब क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र.२ बाबतः-**

**१०.** वर चर्चिल्याप्रमाणे, अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याची बाब तिने प्रथमदर्शनी सिध्द केली आहे. जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ चे पती आहेत. भारतीय संस्कृतीनुसार पत्नीला सांभाळणे हे पतीचे नैतिक कर्तव्य आहे. अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचेमधील नातेसंबंध जाबदार क्र.१ यांना मान्य आहेत तसेच उभयतांना दोन अपत्ये असल्याचे देखील जाबदार क्र.१ यांनी कबूल केलेले आहे. अर्जदार क्र.१ ही तिच्या आईच्या घरी मुलांसह आश्रिताचे जीवन जगत आहे. जाबदार क्र.१ यांचे स्वतःचे असे कथन आहे की, त्यांनी अर्जदार क्र.१ च्या बहिणीस उसने म्हणून रुपये ५०,०००/- दिले होते. याचाच अर्थ असा की, जाबदार क्र.१ यांची आर्थिक कुवत असल्याखेरीज ते रुपये ५०,०००/- उसने देवू शकणार नाही. त्याचप्रमाणे जाबदार क्र.१ यांनी त्यांचे उत्तरदायित्वाचे शपथपत्रामध्ये ते चालक म्हणून काम करत असल्याचे व त्यातून त्यांना रक्कम रुपये १२,०००/- मिळत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांची पोटगी देण्याची ऐपत आहे असा निष्कर्ष काढणे वावगे ठरणार नाही. अर्जदार क्र.१ व २ तसेच जाबदार क्र.१ यांचे मधील नाते, अर्जदार क्र.१ व २ यांच्या दैनंदिन मुलभूत गरजा, त्यांचा औषधपाण्याचा खर्च व सध्याच्या महागाईचा विचार करता तसेच मूळ अर्जाचा अंतिम निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार असल्याचे विचारात घेता, अर्जदार क्र.१ व २ यांना उपजिवीकेचे कोणतेही साधन नसल्याने अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र.१ यांना दरमहा रुपये ४,०००/- व अर्जदार क्र.२ यांना दरमहा रक्कम रुपये ४,०००/- अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तूत अर्जाचा अंतिम निकाल

लागेपर्यंत जाबदार क्र.१ यांनी दयावी असे निर्देश देणे संयुक्तिक व उचित वाटते. सबब, विचाराधीन बाब क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे व विचाराधीन बाब क्र.३ चे निष्कर्षाकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रुपये ४,०००/– (चार हजार मात्र) व अर्जदार क्र.२ यांना दरमहा रक्कम रुपये २,०००/– (दोन हजार मात्र) अशी एकूण रक्कम रुपये ६,०००/–(सहा हजार मात्र) इतकी अंतरिम पोटगी जाबदार क्र.१ यांनी अर्ज दाखल तारखेपासून दयावी.

३. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

४. प्रस्तूत आदेशाची एक प्रत जत पोलीस ठाणे अधिकारी व संबंधित संरक्षण अधिकारी यांना पाठविणेत यावी.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2025.09.29 18:06:29 +0530

दिनांकः–२५.०९.२०२५ (प्रकाश चु. बछले)
जत. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जत.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R. B. Samalewale, Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C.,Jath. |
| Date of order/judgment | : | 25.09.2025 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on. | : | 29.09.2025 |
| Judgment uploaded on. | : | 29.09.2025 |